२८ एप्रिल २०१४ महाराष्ट्र टाइम्स




# विश्वनाथ कराड यांना पुरस्कार

दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृतीदिनानिमित्त देण्यात येणारा पुरस्कार यंदा 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांना देण्यात आला. ज्येष्ठ गायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या हस्ते डॉ. कराड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक, साहित्य, कला व पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे, ज्येष्ठ पत्रकार आनंद दीक्षित यांना देखील यावेळी पुरस्काराने गौरविण्यात आले.